भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.४०३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०५/२०१७

**१) संगनमत करुन एस.टी. बसने भंडारा कडे जात असता अनोळखी महिलांनी हॅन्डबॅग मधील सोन्याचे दागीने व नगदी पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २२/०५/२०१७ चे १३.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी सौ. पुजा प्रथमेश पशिने वय २७ वर्ष रा. कोसरा ही आपले लहान मुलाला घेवुन पतीचे मित्राचे घराचे वास्तु पुजनाकरिता कोसरा येथुन भंडारा येथे एस.टी. बसने जात असता तीन अनोळखी महिलांनी फिर्यादीचे हॅन्डबॅग मधिल एक सोन्याचा गोप ११ ग्रॅम, सोन्याची अंगठी २.५ ग्रॅम, १ सोन्याची चैनसह लॉकेट ३.१३ ग्रॅम, १ सोन्याचा लॉकेट ४.५ ग्रॅम, सोन्याचे टॉप्स ५.३ ग्रॅम, व नगदी १०००/रू. असा एकुण १,०९०००/रू. माल चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. अडयाळ येथे कलम ३७९,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नंदेश्वर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**२) चारचाकी वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालकास धडक देवुन गंभिर जखमी केल्याने उपचारा दरम्यान मृतपावल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २२/०५/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी योगेश्वर कृष्णा मसराम वय ४० वर्ष, रा. जांभळी/खांबा याचा भाचा रजनीकांत रामुजी सय्याम वय २२ वर्ष रा. जांभळी हा टिव्हीएस कंपनीची नविन मोटार सायकलनी नागझीरा टी पाईंट वरून एनच ०६ रोड क्रॉस करित असता देवरीकडुन येणाऱ्या आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, हयगयीने चालवुन मोटार सायकला धडक मारून मोटार सायकल चालक रजनीकांत यास गंभीर जखमी केल्याने त्यास औषधोपचारा करिता उपजिल्हा रूग्णालय साकोली येथे नेले असता तेथील डॉक्टरनी तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पो.स्टे. साकोली येथे कलम २७९,३०४ (अ) भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मडावी पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) टवेरा गाडी चालकांच्या निष्काळजीपणामुळे स्कुटीला मागेहुन धडक मारुन दोन इसमास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २२/०५/२०१७ चे १०.३० ते ११.०० वा. दरम्यान यातील जखमी फिर्यादी रामदास बुधाजी कटकवार वय ६९ वर्ष, रा. सावरी हा आपले स्कुटी क्र. एमएच ३६ टी २४६७ ने मनोज गजभिये वय ४० वर्ष, रा. सावरी याचे सोबत भंडारा वरुन शहापुर कडे येत असता यातील आरोपी टवेरा गाडी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन स्कुटीला मागेहुन धडक मारुन रामदास कटकवार व मनोज गजभिये यांना जखमी करुन अपघाताची माहिती न देता पळुन गेल्याने जखमी बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पो.स्टे. जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

४) पैश्याच्या कारणावरुन भांडण करुन विटाने मारुन जखमी करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २२/०५/२०१७ चे १२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी योगेन्द्र यशवंत शहारे वय ३२ वर्ष, रा. नेहरु वार्ड मेंढा भंडारा हा आरोपी कडे डेकोरेशनच्या कामाचे पैसे मागण्यास गेला असता आरोपीने पैसे मिळाल्यावर देईन असे म्हणुन भांडण करुन फिर्यादीचे डोक्याला उजवे कानाचे वर आरोपीने विट मारुन दुखापत करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पो.स्टे. भंडारा येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

५) मोटार सायकलची चोरी . :–

दिनांक २२/०५/२०१७ चे १४.३० ते १५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी योगेशचंद्र नत्थुजी कावळे वय ६४ वर्ष, रा. राणी लक्ष्मीबाई वार्ड खातरोड भंडारा याने आपली हिरो प्लेझर मोपेड मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ४७४२ किंमती २०,०००/–रु. लाल रंगाची अंगनात ठेवली असता चोराने कुणी नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

६) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :–

दिनांक२२/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. लाखांदुर येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ११ लिटर ७०० मिली लिटर देशी दारु किंमती ३२५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

23.5

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.